# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 15 July 2025
## Time 7.10 AM to 7.20 AM
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक १५ जुलै २०२५ सकाळी ७.१० मि.

****

- महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण सुधारणा विधेयक विधानपरिषदेत मंजूर
- अंमली पदार्थ विक्री प्रकरणी सज्ञानतेचे निकष बदलण्याची मुख्यमंत्र्यांची ग्वाही
- कचरा व्यवस्थापनातील अडचणी दूर करण्यासाठी स्वतंत्र सेल स्थापनेची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा
- एसटीचं कदापि खाजगीकरण होणार नाही–परिवहन मंत्र्यांचा निर्वाळा

आणि

- लॉर्ड्स कसोटीत इंग्लंडचा २२ धावांनी विजय, मालिकेत २–१ ने आघाडी

****

महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण सुधारणा विधेयक काल विधानपरिषदेनं एकमताने मंजूर केलं. विधानसभेनं हे विधेयक गेल्या आठवड्यात मंजूर केलं होतं. अंमली पदार्थांच्या विक्रीत वारंवार अटक करण्यात येऊनही जामीनावर सुटणाऱ्या आरोपींवर कारवाईसाठी, या कायद्यात सुधारणा करण्यात आली आहे.

दरम्यान, अंमली पदार्थ व्यवहार प्रकरणी कायदेशीरदृष्ट्या सज्ञानतेचे निकष बदलण्यात येतील, अशी ग्वाही, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. ते काल विधानसभेत याबाबतच्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देत होते. अल्पवयीन मुलांमार्फत अंमली पदार्थ विक्री करून कायद्यातून पळवाट काढण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे कायद्याच्या व्याख्येत बदल करून सोळा वर्षांच्या आरोपींना अटक करण्याची तरतूद करण्यात येईल, असं त्यांनी सांगितलं. छत्रपती संभाजीनगर इथं अंमली पदार्थ व्यवहार प्रकरणी धडक कारवाई सुरू असून, शैक्षणिक संस्थांच्या परिसरात जाणीव जागृती केली जात असल्याचं, मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. ते म्हणाले…

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

राज्यात शून्य ते शंभर युनिट इतक्या वीज ग्राहकांसाठी त्यांच्या घराच्या छतावर सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याची योजना राबवण्यात येणार आहे, त्यासाठीच्या अनुदान योजनेला मंत्रिमंडळाने मान्यता दिल्याची माहितीही, मुख्यमंत्र्यांनी सदनात दिली.

****

छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश झाल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी काल सदनासमोर निवेदन सादर केलं. ही महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब असून, हे मानांकन टिकवणं तसंच किल्ल्यांचा वारसा जपण्यासाठी नागरिकांनी हातभार लावण्याचं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

विधान परिषदेत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी याबद्दल सरकारचं अभिनंदन करतांना, या वारशाच्या संवर्धनासाठी कायमस्वरूपी उपाययोजनेची गरज व्यक्त केली. ते म्हणाले...

**बाईट – अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते, विधान परिषद**

**

राज्यातल्या महानगरपालिका तसंच नगरपालिकांच्या समोरील कचरा व्यवस्थापनातील अडचणी दूर करण्यासाठी स्वतंत्र सेल स्थापन करण्यात येईल, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल विधानसभेत सांगितलं. ते म्हणाले,

**बाईट – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

**

परभणी जिल्ह्यात सिंचनासाठी जायकवाडी धरणातून पाणी सोडण्याची मागणी आमदार राजेश विटेकर यांनी विधानसभेत केली. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी यासंदर्भात आज कालवा सल्लागार समितीची बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल असं सांगितलं.

**

छत्रपती संभाजीनगरच्या पाणी पुरवठ्यासाठीच्या समांतर जलवाहिनीचा मुद्दा आमदार प्रशांत बंब यांनी विधानसभेत उपस्थित केला. अनेक वर्षांपासून रखडलेल्या या कामात अधिकारी वर्ग संगनमताने भ्रष्टाचार करत असल्याचा आरोप करत, या प्रकरणी सखोल चौकशीची मागणी त्यांनी केली.

**

परभणीचे आमदार राहुल पाटील यांनी सांडपाणी व्यवस्थापन, रेल्वेफाटक, रस्ते बांधणी, आरोग्य आणि शाळादुरुस्तीसह विविध मुद्यांकडे सदनाचं लक्ष वेधून घेतलं. मराठवाडा वैधानिक विकास महामंडळाच्या पुनर्स्थापनेबाबत शासन उदासीन असल्याची टीकाही पाटील यांनी केली.

****

भारतीय अंतराळवीर ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला यांच्यासह ऑक्सिओम-फोर मोहिमेतले सर्व अंतराळवीर आज दुपारी पृथ्वीवर परत येतील. काल सायंकाळी त्यांचा हा परतीचा प्रवास सुरू झाला. या मोहिमेत शुक्ला यांनी १४ दिवस आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात मुक्काम केला.

****

देशाचा सर्वांगिण विकास आणि समृध्दीसाठी विद्यापीठं, शाळांनी विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता वाढवण्यावर विशेषत्वाने भर द्यावा, अशी सूचना राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी केली आहे. काल नांदेड इथं नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयात राज्यपाल बागडे यांचा सत्कार करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. सध्याच्या काळात विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच व्यावहारिक ज्ञान देणं आवश्यक असून, शैक्षणिक संस्थांनी क्रीडा शिक्षणाकडेही लक्ष देण्याचं आवाहन त्यांनी केलं.

दरम्यान, बागडे यांनी काल यवतमाळ जिल्ह्यात नॅचरल शुगर युनिटला भेट दिली. या परिसरात त्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आलं.

****

एस टी महामंडळ ही सुमारे ८३ हजार कर्मचाऱ्यांची मातृसंस्था असून, एसटीचं कदापि खाजगीकरण होणार नाही, असा निर्वाळा परिवहन मंत्री तथा महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिला. ते काल मुंबईत एका कार्यक्रमात बोलत होते. एसटी कर्मचाऱ्यांना सोयी सुविधा पुरवण्यासाठी लवकरच खाजगी स्वच्छता संस्था नेमण्यात येणार असून, कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक सुविधांकडे विशेष लक्ष देण्यात येणार असल्याचं सरनाईक यांनी सांगितलं.

****

लातूर इथल्या नरसिंह प्रतिष्ठानच्या वतीने उभारण्यात आलेला स्पंदन ऑक्सिजन प्रकल्प, जम्मू काश्मीर मधल्या अखनूर इथं उभारण्यात येत असलेल्या शंभर खाटांच्या लष्करी रुग्णालयास हस्तांतरित करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांच्या उपस्थितीत काल हा कार्यक्रम पार पडला. लातूरकरांच्या दातृत्वातून एक कोटी पाच लाख रुपये खर्च करून या प्रकल्पाची उभारणी करण्यात आली होती. सीमेवर देशाचं रक्षण करणाऱ्या जवानांसाठी हा प्रकल्प महत्त्वाचा ठरणार आहे.

****

क्रिकेट

अँडरसन – तेंडुलकर कसोटी मालिकेतल्या लॉर्ड्स इथं झालेल्या तिसऱ्या सामन्यात इंग्लंडनं भारताचा २२ धावांनी पराभव केला. दुसऱ्या डावात १९३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारतीय संघ १७० धावांवर सर्वबाद झाला. इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्स सामनवानीर पुरस्काराचा मानकरी ठरला. या विजयासोबतच इंग्लंडनं पाच सामन्यांच्या मालिकेत दोन– एक अशी आघाडी घेतली आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या छावणी परिषदेचं महानगरपालिकेत विलीनीकरणाची प्रकिया सुरू आहे. याअंतर्गत सदर परिषदेतल्या शाळेत शालेय पोषण आहार सुविधेला कालपासून प्रारंभ झाला. महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या हस्ते काल खिचडी आणि मिठाई वाटप करून या सुविधेला सुरुवात झाली. मनपाच्या शाळेसोबतच सदर शाळादेखील स्मार्ट शाळा बेस्ट शाळा करण्याचा प्रयत्न करणार असल्याचं, आयुक्तांनी सांगितलं.

****

धाराशिव जिल्ह्याच्या कळंब तालुक्यातल्या लोहटा गावास आता महसूली दर्जा मिळण्याचा मार्ग मोकळा झाल्याची माहिती आमदार कैलास घाडगे पाटील यांनी दिली. आमदार पाटील यांच्या मागणीमुळे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बैठक घेऊन प्रशासनाला यासंदर्भात सूचना केली.

****

बीड जिल्हा परिषद गट आणि पंचायत समिती गण काल जाहीर करण्यात आले. यात जिल्हा परिषदमध्ये येवता गट तसंच पंचायत समितीत येवता आणि उमरी या नव्या गणांचा समावेश असणार आहे. जिल्हा परिषदेचे आता एकूण ६१ गट तर पंचायत समितीचे १२२ गण असतील.

****

जालना जिल्ह्यातल्या ग्रामपंचायतींच्या सरपंच पदासाठी काल आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली. यामध्ये भोकरदन तालुक्यातल्या ११९, परतूर – ८९, अंबड – १११, तर जाफ्राबाद तालुक्यातल्या ७३ ग्रामपंचायतींचा समावेश आहे.

****

परभणी जिल्ह्यात पूर्णा तालुक्यातल्या आलेगाव इथं आमदार रत्नाकर गुट्टे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचं काल अनावरण करण्यात आलं. यावेळी परिसरातले शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

****

हवामान

मराठवाड्यात आज अनेक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. विभागात ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याचा अंदाजही हवामान खात्यानं वर्तवला आहे.

****